
Year : 8

# शिक्षण तरंग

# Shikshan Tarang

ISSN : 0976-0636 Vol : 8th Issue Monthly Nov.-Dec 2015

सर्वव्यापी, सर्वकालीन शालेय शिक्षणाच्या ... बांधीलकी असलेले मासिक




...पकीय संपादक

... चव्हाण-काळे

50

सर्वव्यापी,सर्वकालीन शालेय शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी बांधिलकी असलेले मासिक

**संपादक**
प्रा.डॉ.किशोर चव्हाण,नाशिक
**कार्यकारी संपादक**
डॉ.विनय धोंडगे,सातारा
**व्यवस्थापकीय संपादक**
प्रा.अनघा चव्हाण,पुणे
**सहसंपादक**
प्राचार्य डॉ.शोभा कागदे,पुणे
प्राचार्य डॉ.विद्या वाजे,प्रवरानगर
प्रा.डॉ.रविराज फुरडे,बार्शी
प्रा.डॉ. विजय धामणे,पुणे
प्रा.गिरीश पाटील,नाशिक
प्रा.डॉ.माधुरी इसावे,पुणे
प्रा.कुलदिपसिंह राजपूत,पुणे
श्री. संदिप मुळे,पुणे
प्रा.डॉ.सतीश पाटील,धुळे
सौ. माधुरी कि.चव्हाण,नाशिक
**संपादकीय सदस्य**
प्रा.डॉ.अंशु माथूर,भोपाळ(म.प्र.)
डॉ.विष्णू शिखरे,बार्शी
प्रा.डॉ.गणेश मुढेगांवकर,सोलापूर
प्रा.डॉ.बी.एम.पाटील,उस्मानाबाद
प्रा.डॉ.सर्जेराव चव्हाण,रत्नागिरी
प्रा.बाळासाहेब दिघे,पुणे
**तज्ज्ञ सल्लागार**
प्रा.डॉ.व.झा.साळी,पुणे
मुख्या. श्री.दत्तात्रय गेणुजी काळे, कोकणगाव (संगमनेर)
प्रा.डॉ.सुभाष भालेराव,नाशिक
प्रा.डॉ.न.सा.तांबोळी,नाशिक
प्रा.डॉ.शोभना जोशी-शेटकर,औरंगाबाद
प्रा.डॉ.के.के.जाधव
प्रा.डॉ.देवेंद्र जोशी,नांदेड
प्रा.डॉ.आर.पी.भामरे,नाशिक
प्रा.डॉ.दिगंबर दुरगाडे,पुणे
मुख्या.राजेश गोळे,रायगड
**मुखपृष्ठ,अंतर्गत सजावट,तंत्रसहाय्य**
नितीन कोठावदे

# शिक्षण तरंग

# SHIKSHAN TARANG

**लेखांची भाषा :**
मराठी / हिन्दी / English

**Printed by** Anagha Kishor Chavan, Published by Anagha Kishor Chavan **on behalf of (or owned by)** Anagha Kishor Chavan and **Printed at** Vaibhav Enterprises,Flat No.12, Siddhakala Sankul, Manikshaw Nagar, Kathe Galli, Dwarka,Nashik and **Published at** Insight Publication,Shop No.,Shrirang Mangal Apartment, Shrirang Nagar, Gangapur Road, Nashik - 422013.
**Editor :** Dr. Kishor Chavan.

या अंकातील लेखकांचे विचार स्वतंत्र आहेत.
त्यास संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.



Scanned with CamScanner

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखाचे शीर्षक / लेखक | पृ.क्र. |
|---|---|---|
| | **संकल्पनात्मक / वैचारिक लेख** | |
| १ | ज्योतीसावित्री आणि स्त्रीवाद<br>डॉ.कविता साळुंके | ०५ |
| २ | प्रकल्पातून मूल्य संस्कार<br>सौ. कल्पना बाळासाहेब चव्हाण | ०९ |
| ३ | संस्कृती नाशिकची : नवी ओळख रामराज्य ढोलताशा पथक<br>प्रा. गिरीश पाटील | ११ |
| ४ | पर्यावरण आणि ई-कचरा<br>प्रा. अनघा चव्हाण-काळे | १३ |
| ५ | The Technology Behind Aquila<br>Prof. Rajshree Salve | १५ |
| ६ | एक कदम स्वच्छता की ओर<br>'अक्षरमाया' द्वारा - गिरीश पाटील | १९ |
| | **संशोधनात्मक लेख** | |
| ७ | मिथिलेश्वर के 'जमुनी' कहानी संग्रह का प्रतिपाद्य<br>रौंदळ सुप्रिया गोपाळराव | २१ |
| | सोशल मिडीयाची चाहुल | २७ |
| | व्हॉटस्‌ॲप तरंग | ३१ |
| | शैक्षणिक घडामोडी : वातम्या ,अभिनंदन | ३२ |
| | पुस्तक परीक्षण | ३३ |
| | शब्दतरंग | ३४ |
| | सिंहावलोकन - प्राचीन भारतीय ज्ञानाचे | ३५ |


***

डॉ.कविता साळुंके
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ,नाशिक

**हातात सदैव पोळपाट लाटण्याऐवजी पाटी व पेन्सिल घेतलेली स्त्री म्हणजे सावित्रीबाई, असा उलेख केला तर तो अतिशयोक्ती ठरणार नाही. केवळ हिंदूच नव्हे तर मुसलमान स्त्रियांनाही दास्यातून मुक्त करण्याचे कार्य त्यांनी केले.**

# १ ज्योतीसावित्री आणि स्त्रीवाद

महात्मा फुले — कार्यकाळ — १८२७-१८९१
सावित्रीबाई फुले — कार्यकाळ — १८३४-१८९७

**प्रास्ताविक :**

महात्मा फुले म्हटले की सर्व स्त्रीयांच्या माना गर्वाने उंच होतात. कारण मुलींसाठी शाळा काढणारे ते पहिले भारतीय भारतातील स्त्री शिक्षणाचे जनक म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. स्त्रियांना त्यांचे हक्क व स्वातंत्र्य मिळाले पाहिजे या ध्येयाने पेट ले ली मशाल असाही ज्यांचा नामोल्लेख होतो, पिडीतांचा कनवाळू, मानवी समतेची घोषणा करणारा लोकनेता, जनतेच्या दुःखाला आणि दारिद्र्याला वाचा फोडणारा हा महात्मा, या निमित्ताने प्रथमतः सर्वांसमवेत सहृदयतेने सत्यमेव जयते या उद्घोषणेचा जयजयकार करणाऱ्या या सत्यशोंधकाने त्याला विनम्र अभिवादन.

स्त्री म्हटली की अबला, कोणाची तरी मुलगी, कोणाचा तरी माता, कोणाची तरी बहीण, कुणाची तरी पत्नी, कुणाची तरी वहीनी अशी विविध विशेषणे लावण्यात येतात. थोडक्यात कुणाची तरी कोणीतरी प्रत्येकाचे निमुटपणे ऐकणारी, प्रत्येकाची सेवा-सुश्रुषा करणारी, सहनशील त्यागी अशी मोठमोठी दुषणे देऊन तिला गौरविणे पण त्यात मारुन टाकलेले तिचे अस्तित्वमात्र दुर्लक्षित. आज स्त्रियांना बरोबरीचे स्थान दिले जाते. पण आजही तिला बालकाच्या संगोपनाच्या मुख्य भूमिकेतून दूर जाता येतनाही. कारण समाजाने घालून दिलेले आदर्श महात्मा फुलेंनी खऱ्या अर्थाने याला न्याय दिला.

पूर्वीच्या काळी विधवांच्या पुनर्विवाहास विरोध, विधवांचे केले जाणारे केशवपन या प्रथा खूपच जोरात होत्या. भली भली माणसे लोकनिंदेमुळे या प्रथांना विरोध करण्याचे ठरवू नुसत्या माघारी फिरत. त्या काळात महात्मा ज्योतीराव फुले मात्र आपल्या विचारांनी ठाम राहिले. त्यांनी या अनिष्ठ प्रथा तर




Scanned with CamScanner

मोडल्याच त्याच बरोबर क्षुद्र व स्त्रीशिक्षणाच्या कार्यातही युगप्रवर्तक असे कार्य के ले. भारतीय परंपरेने स्त्री व शुद्र यांना एकाच दावणीत बांधून त्यांना शिक्षणापासून वंचित केले होते.त्यांना अज्ञानांधकारात पिचत ठेवले होते. ज्योतीरावांनी या सर्वांना शिक्षणाचे दरवाजे खुले केले.

**जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले :**

जोतिबा फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. वडिल गोविंदराव पुण्यात भाजी विक्रेते होते. मुळचे सातारा जिल्ह्यातले. त्यांच्या मातोश्री ज्योतिबा एक वर्षाचे असतानाच स्वर्गवासी झाल्या. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर जोतिरावांना शिक्षण सोडावे लागले. त्यानंतर त्यांनी आपल्या वडिलांच्या कामात मदत करणे सुरु केले. अवघे १३ वर्षाचे असताना त्यांचे लग्न सावित्रीबाईशी झाले.



जोतिरावांचे शिक्षणावरील प्रेम पाहून त्यांच्या शेजारील दोन शिक्षकांनी (मुस्लीम व ख्रिश्चन) जोतिबांना मा ध्यमिक शाळेत १८४१ मध्ये शिकण्यास मान्यता दिली. त्यांना नंतर पुण्यातील स्कॉटीश मिशन शाळेत प्रवेश मिळाला. आपले शिक्षण संपल्यानंतर शासनाची नोकरी त्यांनी नाकारली. १८४८ मध्ये असणारी जातीयता आणि ब्राह्मण सेटअप त्यांना खटकू लागला. त्यातच त्यांच्या ब्राम्हण मित्राने त्यांना एकदा लग्नाला बोलावले असताना जोतिबा माळी समाजाचे म्हणून त्यांना तेथे थांबू दिले गेले नाही. त्याचा परिणाम जोतिबांच्या मनावर खोलवर झाला. त्यानंतर जोतिबांनी क्षुद्रे आणि महिलांना समाजात स्थान मिळवून देण्याचे ध्येय निश्चित केले.

जोतिबा फुले त्यांच्या नावाप्रमाणेच महान होते. त्यांच्या नावातूनच त्यांचे जवळ सर्वांना उजळून टाकणारी ज्योत आणि आई नसतानाही एखाद्या कुशल माळ्याप्रमाणे सर्वांगीण नीट अंतर्बाह्य जोपासना करुन फुलविले गेलेले फुले मन होते. तत्कालिन मानवी समाजातील वास्तवाची युगक्षमता व युगसापेक्षता न्याहाळणारे व अनुभवणारे हे वेदनाव्याकुळ असे कविमन होते. या मनाला वेदनेबरोबर विचारशक्ती व कृतिक्षमतेची साथ देऊन त्यांनी रंजल्या गांजलेल्यांचे दुःख दर्द पाहिले. त्यांच्या दुःखद वेदनांशी स्वाभाविकपणे समरस झाले. आणि परिणाम म्हणून जोतिबा मोठ्यांचे महात्मा तर महात्म्यांचे विराटात्मा झा ले. आपल्या महान विचारांनी त्यांनी उच्चवर्णियांना लाजवले.

सावित्रीबाईजा जन्म ३ जानेवारी १८३१ साली सातारा जिल्ह्यात नायगाव येथे झाला.त्यांच्या वडिलांचे नाव कान्होजी नेवसे व आई लक्ष्मी होते. सावित्रीबाईची स्वभाववैशिष्ट्ये म्हणजे त्या कुणाला घाबरत नसत, सिन्सिअर, खुलेपणा, सह्रदयी, खरे बोलणाऱ्या आणि सत्यासाठी काहीही करणाऱ्या होत्या. म्हणूनच की काय त्यांची आणि जोतिरावांची जोडी खूपच छान जुळली. आणि त्यांनी जोतिबा फुलेंना आपल्या क्रांतीकारक कार्यात आयुष्यभर साथ देऊन उपकृत केले. इतर स्त्रियांप्रमाणे त्याही पतिव्रता होत्या. पण त्या थोड्या वेगळ्या इतर स्त्रियांचा पतिव्रतापणा म्हणजे पतीच्या पावलावर पाऊल टाकून विचार शून्य,आंधळेपणाने, भाबड्या, निष्पाप व निर्मळ मनाने चालने होते. सावित्रीबाईची पतिव्रता म्हणजे समाजपरिवर्तनाचे व्रत घेणाऱ्या क्रांतिकारी, जगावेळ्या नवऱ्याला आमरण साथ देऊन त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून चालणे होते. अशी पतिव्रता सावित्रीबाई ही एकमेव म्हणता येईल.स्त्री शिक्षणासंदर्भातील संक्रमणण काळातील त्या पहिल्या भारती स्त्री,शिक्षिका , समाजसेविका, क्रांतिकारक पंडित असा त्यांचा उल्लेख करता येईल.

हातात सदैव पोळपाट लाटण्याऐवजी पाटी व पेन्सिल घेतलेली स्त्री म्हणजे सावित्रीबाई, असा उल्लेख केला तर तो अतिशयोक्ती ठरणार नाही. केवळ हिंदूच नव्हे तर मुसलमान स्त्रियांनाही दास्यातून मुक्त करण्याचे कार्य त्यांनी केले. आपल्या शाळेत प्रवेश देताना अस्पृश्य, बहिष्कृत व मुसलमान समाजातील मुलांना त्यांनी मुद्दामच प्रवेश देऊन शिक्षित केले. एवढेच नव्हे श्रीमती फातिमा या मुसलमान शिक्षिकेला हाताशी धरुन शाळा चालवली. अशा या फुले पती पत्नीचे जीवन म्हणजे एक



56

Scanned with CamScanner

महाकाव्यच म्हणता येईल.

'जोतिसावित्री' ज्योतीने एक युगज्योत पेटवून गुलामगिरी अंधारात चाचपडणाऱ्या , असहायतेने मानसिक आंधळेपण प्राप्त झालेल्या भारत देशातील शुद्रांना, स्त्रीयांना अंतिम मानव मुक्तीकडे जाणारी प्रकाशाची चिरंतन वाट दाखविली. म्हणूनच इंग्रजी आमदानीतील पहिले बंडखोर म्हणून त्यांचा उल्लेख आजही गौरवाने करतात.

**महात्मा फुलेंची स्त्री विषयक विचार –**

जोतिबा म्हणतात, स्त्री अथवा पुरुष हे वेगळे नसतात. भेदभाव न करता त्यांनी एकमेकांशी सत्यवर्तन करुन रहायला हवे. दोघांनाही सारखे हक्क हवेत. पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही धर्म व राजकीय स्वतंत्रता दिली पाहिजे. स्त्रीया ह्या पुरुषांपेक्षा श्रेष्ठ असतात . स्त्रीया निर्मात्या सृजनशील असतात, त्यांचे उपकार कधीच फिटू शकत नाही. त्री शिवाय घराला शोभा नसते. निरपेक्ष बुद्धीने ती सारी कर्तव्य पार पाडते.प्रत्येकाच्या संमतीचा विचार करुन कामे करते. छक्केपंजे त्यांना जमत नाही. एवढेच नव्हे तर ती पतिव्रता असते. पुरुषांमध्ये ही वैशिष्ट्ये विरळच दिसतात. अशा या वैशिष्ट्यांनी शृंगारलेल्या स्त्रीला शिक्षणापासून वंचित करणे म्हणजे महान अपराधच असे जोतिबा मानत.

**महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षणातील योगदान :**

महात्मा फुले हे समाजातील सर्वात शेवटच्या वर्गाला शिक्षण देणारे प्रथमपुरुष होत. त्यांनी १८४८ मध्ये क्षुद्र व महिलांसाठी पहिली शाळा काढली. त्यावेळी त्यांचे हे कार्य मोडून काढण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले. मुलींच्या शाळेत शिकवण्यासाठी त्यांना महिला शिक्षिका मिळत नव्हती. म्हणून त्यांनी खूप बोल्ड पाऊल उचलले व आपल्या पत्नीलाच म्हणजे सावित्रीबाईनाच शिकवून शिक्षिका केले. सावित्रीबाईही जोतीबांच्या प्रभावाने प्रेरित होत्या त्यांनाच आपण भारतातील पहिल्या महिला शिक्षिका म्हणून मानतो. अर्थात त्यावेळी या कार्यात त्यांना समाजाने खूप त्रास दिला. विशेषत: त्यावेळच्या ब्राह्मण समाजातील पुरुष वर्गाने. कारण त्यांना त्यांचे अस्तित्व जपायचे होते.त्यांनी त्यांच्या अंगावर माती शेण फेकायलाही कमी केले नाही. पण सावित्रीबाईनी आपल्या मिशनचा एक भाग म्हणून ते सहनकेले. त्या लोकांना विरोध न करता त्यांनी शाळेत जाताना साड्यांचे दोन सेट घेऊन जाणे सुरु केले. आपल्या स्वत:च्या घरात अनेक विधवांना राहण्यासाठी जागा दिली व त्यांना शिक्षण पुरवले. सावित्रीबाई महात्मा फुलेंबरोबर सावली सारख्या खंबीरपणे उभ्या राहिल्या महात्मा फुलेंच्या निधनांनंतरही स्वत:च्या मृत्युपर्यंत (१८९१) त्यांनी त्यांचे हे कार्यअविरत सुरु ठेवले. त्या एक कवियित्रीही होत्या. त्यांची शिक्षणाबाबतची एक कविताही आहे. ती मुद्दामच येथे मांडली आहे.

Go get Education
Be self – reliant, be industrious
Work, gather wisdom and riches,
All gets lost without knowledge
We become animal without wisdom,
Sit idle no more, go and get education
End misery of the oppressed and forsaken,
You've got a golden chance to learn
So learn and break the chains of caste,
Throw away the Bra human's scriptures fast.

- Poem by SavitribaiPhule.

ह्या दोघांनी १ जानेवारी १८४८ मध्ये पहिली मुलींची शाळा पुण्यात भिडे वाड्यात सुरु केली .जेथे त्यांनी स्वत:च मुख्याध्यापकाचे काम केले. त्यानंतर १८४९ मध्ये प्रौढशिक्षण वर्ग सुरु केले. १४ जानेवारी १८५२ मध्ये पहिले पब्लिक स्कूल महिला सेवा मंडळामार्फत सुरु केले. त्यांच्या या कामाचा ब्रिटीशांनी १६ नोव्हेंबर १८५२ मध्ये सत्कार केला. त्यांना आदर्श शिक्षण म्हणून गौरविले. १८५५ मध्ये शेतमजूरांसाठी रात्र शाळा काढली. १८७४ मध्ये काशीबाई नावाच्या ब्राह्मण विधवेचे मुल दत्तक घेतले. कोणत्या ही प्रकारचा द्वेष मनात न ठेवता त्या मुलाला आपला वारस म्हणून वाढविले.

सावित्रीबाईंनी जोतिबा फुलेंना दिलेली साथ देखावा नव्हता. हे त्यांच्या वागण्यातून दिसते.

जोतिबांना देवाज्ञा झाली त्यावेळी माळी समाजाने त्यांच्या औरसपुत्र यशवंताला त्यांच्या अंत्यविधीचे अधिकार देण्याचे नाकारलेकारण त्यांना जोतिबा सावित्रीबाईंनी यशवंताला दत्तक घेणे मान्य नव्हते. परंतु जोतिबांच्या दु:खात बुडालेल्या सावित्रीबाईंना ते कळले तेव्हा त्यांच्यातील सावित्री उठून बाहेर आली स्वत: टिटवे हातात घेतले आणि यशवंतसह सर्वअंत्यसंस्कार केले . केवढे मोठे धाडस त्यांनी त्या काळात दाखवले हे त्यावरुन लक्षात येते. त्या अंतर्बाह्य जोतिबांच्या विचारांनी भारलेल्या होत्या हे त्यातून दिसते.



Scanned with CamScanner

तसेच जोतिबा गेल्यानंतर पुण्यात प्लेगची साथ आली. इंग्रज अधिकारी प्लेग संसर्गजन्य असल्याकारणाने प्लेगच्या रुग्णांना शोधून गावाबाहेर काढत होते. खरेतर त्या रुग्णांना अन्न, पाणी, सेवा व औषधांनी गरज होती. त्यावेळी सावित्रीबाईंनी गावाबाहेर एक समाज रुग्णालय उघडण्याची कल्पना मांडली . त्यासाठी इंग्रज अधिकारी ,कलेक्टर यांच्या त्यांनी विनवण्या केल्या. कोणीही ऐकत नाही म्हटल्यावर स्वत: सेवा सुरु केली. आपला मुलगा यशवंताला त्यांनी अहमदनगरहून बोलावून घेतले व एक समाज रुग्णालय गावाबाहेर उघडले. प्लेगच्या रोगींना स्वत:च्या पाठीवर उचलून गावाबाहेर रुग्णालयात त्या स्वत: आणू लागल्या. आणि त्याच काळात त्यांना प्लेगची साथ होऊन त्यांचा अंत झाला. या प्रसंगातून स्वत:च्या जीवनाचीही त्यांनी समाजकार्यापुढे पर्वा केली नाही असे दिसते. एवढ्या त्या जोतीबांच्या विचारांनी प्रभावित झाल्या होत्या. त्या जोतिबांच्या केवळ सावली नव्हे तर त्यापलीकडे होत्या हेच यातून आपल्या लक्षात येते.

**सारांश –**

थोडक्यात मित्रहो, जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले हे दोघेही आयुष्यभर वंचितांसाठी लढले. त्यांनी ब्राह्मण व अब्राह्मणांमधील दुरी दूर करण्यासाठी खूप प्रयत्न केले. जोतिबा फुले व सावित्रीबाई दोघांचाही जन्म सातारा जिल्ह्यातला. त्यामुळे त्यांचा सांस्कृतिक पार्श्वभूमी समान, विचार जुळले आचार, आचार जुळले आणि त्यांनी अनन्यसाधारण काम केले. आपल्या क्रांतीकारी नवऱ्याच्या खांद्याला खांदा देऊन स्त्री शिक्षणाची ज्योत पेटविली. आज त्याचाच परिणाम म्हणून स्त्रीयांची झालेली प्रगती. आता गरज आहे ती आपण सर्वांनी ती ज्योत पेटवत ठेवण्याची सद्विचाराने प्राप्त स्वातंत्र्य आणि संधीचा उपभोग घेण्याची. कोणत्याही परिस्थितीत स्त्री शिक्षणामुळे स्वैराचार येणारनाही याची काळजी घेण्याची. 'एक स्त्री शिक्षीत झाली तर संपूर्ण कुटुंब घडवते.' या उक्तीला सार्थ करण्याची. सावित्रीबाई महात्मा फुलेंच्या नावाला उत्तुंगता आहेच ते आणखी वृद्धिंगत करण्याची.

धन्यवाद

**जोतिबा म्हणतात–**

सारे स्त्री पुरुष भावंडात लेखी ।
मांग म्हारा दु:खी करिताती ।।१।।
ख्रिस्त महंमदा सत्यांने आळवी।
मानवा वळवी।। ईशाकडे।।२।।
धर्म–देशजाती–भेद नाही तिला।।
शोभे मनुष्याला ।। खरी मजा।।३।।
अशा मानवीस सत्स्त्री म्हणावी ।
तिची कीर्ती गावी ।। जोती म्हणे।।४।।

❑❑❑


## सुमन मल्टिमिडिया एज्युकेशन सिरीज, नाशिक निर्मित

## डॉ.किशोर चव्हाण यांच्या

# शैक्षणिक सीडीज्

| | | | |
|---|---|---|---|
| १. आपत्ती व्यवस्थापन (दृकश्राव्य) | रु. २००/– | ५. स्वयं अनुदेशन कार्यक्रम (दृकश्राव्य) | रु. १००/– |
| २. वायू प्रदूषण (दृकश्राव्य) | रु. २००/– | ६. ध्वनी प्रदूषण (दृकश्राव्य) | रु. २००/– |
| ३. वणवा (दृकश्राव्य) | रु. १००/– | ७. माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान | रु. २००/– |
| ४. Computer Assited Instruction (CAI) | रु. १००/– | ८. मधुमक्षिका पालन (दृकश्राव्य) | रु. २००/– |

**संपर्क : इनसाईट बुकवर्ल्ड**

शॉप क्र.३, श्रीरंग मंगल अपार्टमेंट, श्रीरंगनगर, गंगापूर रोड,
नाशिक.फोन नं (०२५३)२५७४३४४.




58

Scanned with CamScanner